| पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८. करआकारणी व करसंकलन विभाग | |
|---|---|
| परिपत्रक स्वरुप | सामान्य करात सूटीबाबत |
| परिपत्रक क्रमांक | कर/मुख्य/६/कावि/४७० /२०११, दिनांक - ३/०८/२०११ |
| विषय | संपूर्ण मिळकतकराची रक्कम आगाऊ भरणा-यांकरीता सामान्यकरात सुट देणेबाबत |
| अंमलबजावणी कालावधी | धोरण अंमलात असे पर्यंत |
| कोणाच्या माहितीसाठी | प्रशासन अधिकारी / सहा.मंडलाधिकारी / गट प्रमुख / रोखपाल / उपलेखापाल |
| संदर्भ | महापालिका सभा ठराव क्रमांक ११६५, दिनांक २१/०७/२०११ |

परिपत्रक

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२७ व १२९ मधील तरतूदीनुसार शहरातील इमारत व जमिनीवर मालमत्ताकराची आकारणी केली जाते. अनुसूची ड प्रकरण ८ नियम ३९ अन्वये मिळकतकराचे बिल बजाविणेत येते. तसेच नियम ३० अन्वये मालमत्ता कर ०१ एप्रिल व ०१ ऑक्टोबर रोजी सुरु होणा-या सहामाही हप्त्याने आगाऊ देय असतो.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४०अ मधील तरतूदीनुसार महानगरपालिका दोन्ही सहामाहीच्या कराची संपूर्ण रक्कम आगाऊ विशिष्ट दिनांक निश्चित करुन मिळकतधारकास भरणेबाबत सर्वसाधारण आदेशाद्वारे निर्धारण करुन अशा आगाऊ दोन्ही सहामाहीच्या रक्कमा भरणा-या मिळकतधारकांकरिता मालमत्ताकरात सूट देणेबाबत कार्यवाही करु शकते अशी तरतूद आहे. मा. स्थायी समितीने ठराव क्रमांक १४३०९, दिनांक २१/०६/२०११ व मा.महापालिका सभेने ठराव क्रमांक ११६५ दिनांक २१/०७/२०११ अन्वये दोन्ही सहामाहीच्या रक्कमा आगाऊ भरणा-या मिळकतधारकांकरिता सामान्यकरात सूटीचे धोरण ठरविले आहे. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश निर्गत करणेत येत आहेत.

१) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४०अ मधील तरतूदीनुसार जे मिळकतधारक चालू सरकारी वर्षाकरिताचे मिळकतकराचे बिलाचे देयकाप्रमाणे थकबाकीसह चालू मागणीतील दोन्ही सहामाहींची संपूर्ण रक्कम दरवर्षी ३० जूनपूर्वी बिल मिळो अथवा न मिळो भरणा करतील, अशा मिळकतधारकास चालू सरकारी वर्षाचे चालू मागणीतील देय सामान्य कर (सामान्य करामध्ये सामान्य कर + अग्निशामक + शिक्षण उपकर + साफसफाई कर हे कर समाविष्ट आहेत) रक्कमेच्या खालील नमूद प्रमाणे रक्कम मिळकतीस सूट देणेत यावी.

- स्वतंत्र नोंद असलेल्या निवासी वापराच्या मिळकतीस - **१० टक्के सूट**
- बिगरनिवासी / मिश्र / औद्योगिक / मोकळ्या जमिनी इत्यादी मिळकतीस - **०५ टक्के सूट**

२) महानगरपालिकेमार्फत माजी सैनिक / स्वातंत्र्य सैनिक रहात्या निवासी मिळकती, महिलांचे नावे असलेल्या रहात्या निवासी मिळकती, आगाऊ मिळकतकर भरणा-यांकरिता मालमत्ताकरातील सवलत योजना या मालमत्ता करातील सवलतीच्या अंमलात असलेल्या योजनेपैकी कोणत्याही फक्त एका योजनेचा लाभ मिळकतधारकास घेता येईल.

**३)** सदर धोरणाचे अंमलबजावणीकामी चालू वर्षी माहे जून कालावधी संपला असल्याने **सन २०११-२०१२ करिता बिल भरणेची मुदत ३० जून ऐवजी ३१ ऑगस्ट निर्धारित करणेत येत आहे.**

**४) पुढील वर्षापासून मालमत्ता करातील सवलतीच्या अंमलात असलेल्या सर्व योजनांकरिता बिल भरणेची मुदत ३० जून निर्धारित करणेत येत आहे.**

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८.

प्रति,
१) सहा.मंडलाधिकारी, --------------- विभागीय कार्यालय
२) प्रशासन अधिकारी, --------------- विभागीय कार्यालय

प्रत :
१) मे. प्रॉबिटी सॉफ्ट प्रा.लि.,
२) मुख्य लेखापरिक्षण विभाग
३) लेखा विभाग